**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र.३४२/२०१२</u>**

ताराबाई अनंता पाटील व इतर
विरूध्द
ताराबाई काशिनाथ पावशे व इतर

**<u>आदेश निशाणी क्र.६२ वर</u>**

प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे हरकत अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून प्रतिवादीपणात समावेश करण्यासाठी सादर केला आहे. अर्ज, वादीचे म्हणणे व दावा वाचला. कागदपत्र अवलोकन केले. वादी व अर्जदार यांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जकथन थोडक्यात असे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी १२.५ टक्के योजनेअंतर्गत सिडकोकडून मिळणारे भूखंडाचे हक्क, अधिकार व हितसंबंध अर्जदाराच्या हक्कात हस्तांतरीत करण्याचा करार दिनांक ०६-०१-२००६ रोजी रक्कम रू.२०,०१,०००/- मोबदला रक्कमेवर दिला व मोबदला रक्कमेपैकी रू.५,७५,०००/- रक्कम अदा केली आहे. त्यानंतर नोव्हेंबर २००६ मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ हे त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत असे समजल्यावरून अर्जदाराने न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ विशेष करार पुर्तता आदेशाकरीता दाखल केला होता. सदर दावा प्रलंबित असतांना समझोता झाला व मोबदला रक्कम वाढवून रू. १,५९,५०,०००/- ठरवणेत आली. अर्जदार प्रतिवादी क्र.१ व २ व त्यांचे वारसांनी दिनांक ०९-०४-२००७ रोजी न्यायालयात तडजोड संमती दाखल केली व अतिरिक्त मोबदला रू.

३९,८७,५००/- स्वीकारला. तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे नवीन विक्री कराररनामा दिनांक ०९-०४-२००७ रोजी प्रतिवादी क्र.१ व २, त्यांचे वारस व अर्जदार यांचेत निष्पादित झाला. त्यानंतर पुन्हा अर्जदाराने नियमीत दिवाणी दावा क्र.२१२/२००९ प्रतिवादी क्र.१ व २ व त्यांचे वारसांविरूध्द भूखंड मिळकतीत त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करू नये अशा मनाई आदेशासाठी दाखल केला होता. सदर दाव्यात प्रतिवादी क्र.१ व २ व त्यांचे वारसांनी मोबदला रक्कम रू.१,१७,६२,५००/- स्वीकारल्याचे मान्य केले आहे. विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ या दाव्यातील तडजोड हुकूमनामा अंमलबजावणीची दरखास्त न्यायालयात दाखल केली आहे व प्रलंबित आहे. अर्जदार यांनी मोबदला रक्कम अदा केली आहे व मिळकतीबाबतची प्रकरणे काळजीपुर्वक हाताळत आहेत. या कारणास्तव प्रस्तुत दाव्यातील वादप्रश्न हे प्रस्तुत अर्जदाराचे हक्कावर परिणाम करणारे आहेत. प्रस्तुत दाव्यातील विपरीत निर्णय हे अर्जदाराचे नुकसान करणारे आहे. त्यामुळे अर्जदाराची उपस्थिती आवश्यक आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी अर्जदार आवश्यक पार्टी आहे त्यामुळे त्यास प्रतिवादी म्हणून समावेश करण्यासाठी प्रस्तुत अर्ज केला आहे.

३. वादीने निशाणी ६६ वर अर्जास म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्ज कायदेशीर व योग्य नाही. वादींनी दावा मिळकतीतील खंडू बाळू पाटील याचे हिश्याबाबत ठराव व मनाई आदेशाकरीता दावा केला आहे. वादींनी दावा मिळकतीत १/२ हिस्सा मिळण्यासाठी दावा केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांचेसोबतचा दिनांक ०६-०१-२००६ रोजीचा अर्जदाराचा कथीत विक्री करार हा मुदतबाहय करार झालेला आहे. त्यामुळे सदर कराराद्वारे कौटुंबिक वाटपाचे दाव्यात समावेश

करता येणार नाही. प्रस्तुत अर्जदाराने विशेष दिवाणी दावा क्र. ५८७/२००७ या प्रकरणात कराराबाबत स्वतंत्र दावा दाखल करावा. सदर हुकूमनामा प्रस्तुत वादीवर बंधनकारक नाही व त्यांचेशी संबंधीत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष व कारणमीमांसा पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | हरकतअर्जदार ही सदर दाव्याचे कामी आवश्यक व/किंवा योग्य पक्षकार आहे का ? | ...होय. |
| २. | आदेश काय? | ...आदेशाप्रमाणे |

## :: कारणमीमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता. :-**

५. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे हरकतदार/अर्जदार यांना तसेच अर्जात नमूद व्यक्तींना प्रतिवादी म्हणून समावेश करण्यासाठी सादर केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रकरणात वादातीत असलेले सर्व वादप्रश्न परिणामकारकपणे आणि पूर्णत: निर्णीत करण्यासाठी उपस्थिती आवश्यक असलेले व्यक्तींना पक्षकारांचे अर्जावरून किंवा स्वत:हून न्यायालय पक्षकार म्हणून समावेश करण्याचा आदेश पारीत करता येतो.

६. प्रस्तुत अर्जास वादीचे वतीने हरकत घेतलेली आहे. प्रकरणात पक्षकार म्हणून सामील कोणास करावे हा वादीचा स्वेच्छाधिकार आहे.

७. प्रस्तुत अर्जात नमूद व्यक्ती यांची दाव्याचे कामी उपस्थिती आवश्यक आहे का? हे तपासणे आवश्यक आहे. प्रस्तुत दावा, दावा परीच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत वाटप व इतर अनुतोष मिळणेकरीता वादीने सादर केला आहे. दावा परीच्छेद २ मधील मिळकती संदर्भातील वाद हा केवळ वादी व प्रतिवादी यांचे कुटूंब यांचेशी संबंधीत आहे. प्रस्तुत दावा १९९८ साली दाखल केलेला आहे. दावा मिळकती संपादनाचे मोबदल्यात सिडको कार्यालयाकडून भूखंड मिळकत वाटप करण्यात आली आहे. या संदर्भातील मिळालेले भूखंड मिळकतीचे वर्णन संबंधीत सुधारणा वादीने अद्याप दाव्यात समावेश केलेली नाही.

८. प्रस्तुत अर्जदाराने नियमीत दिवाणी दावा क्र. ५८७/२००६ या प्रकरणातील हुकूमनाम्याची प्रत नियमीत दिवाणी दावा क्र.२१२/२००९ या प्रकरणातील जबाब/कैफियतीची छायांकीतप्रत, दावा व निशाणी ५ अर्ज व आदेशाची छायांकीतप्रत सादर केलेली आहेत. सदर कागद सकृतदर्शनी दर्शवतात की, प्रस्तुत दाव्यात वादग्रस्त मिळकत व संपादनापोटी मिळणारे भूखंड मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.१ व २ व त्यांचे वारस तसेच प्रस्तुत अर्जदार यांच्यात करार झाला आहे व कराराच्या अनुषंगाने विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ या दाव्यात तडजोड हुकूमनामा कराराची विशेष पुर्ततेबाबत पारीत झालेला आहे. दावा मिळकत व पर्यायाने भूखंड मिळकतीबाबत प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांच्यातील वाटप हिस्से या अनुषंगाने तसेच प्रतिवादींचा सदर दावा

मिळकतीत संपूर्ण हक्क आहे किंवा निम्मा हिस्सा आहे या सर्व वादप्रश्नांचा परिणाम हा प्रस्तुत अर्जदाराच्या हक्कावर होणार आहे. गुंतागूंत टाळणे तसेच पक्षकारांतील वादप्रश्नाचा अंतिमत: व परिणामकारकपणे निर्णय होण्यासाठी प्रस्तुत अर्जदाराची उपस्थिती आवश्यक व जरूरीची आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. याप्रमाणे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नोंदवून पुढील आदेश पारीत करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. निशाणी ६२ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद केल्याप्रमाणे हरकत अर्जदार यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून वादीने समावेश करावे व तशी सुधारणा करावी असे वादीस आदेशीत करण्यात येते.

३. वरीलप्रमाणे सुधारणा १४ दिवसाचे आंत करावी. यात कसूर केल्यास दावा विनाकारवाई खारीज करण्यात येईल.

पनवेल,
दिनांक : ०३-०२-२०२३.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.